


म. ग्र. सं. ठाणे
विषय काव्य
क्र. 2029

REFBK-0012744
REFBK-0012744

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय

# उ त्स व

## मंगेश पाडगांवकर यांचीं पुस्तकें

धारानृत्य १९५०

जिप्सी १९५३, १९५९

छोरी १९५७

शर्मिष्ठा १९६०

उत्सव १९६२

निंबोणीच्या झाडामागें १९५४, १९५८

# उत्सव

मंगेश पाडगांवकर

REFBK-0012744

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

मूल्य चार रुपये

प्रथमावृत्ति : भाद्रपद १८८४
सप्टेंबर १९६२

© मंगेश पाडगांवकर

मुद्रक : विष्णु पुरुषोत्तम भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक : गणेश रामराव भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी, ताडदेव रोड
मुंबई ३४ W B

श्री० विष्णुपंत भागवत यांस प्रेमपूर्वक

# अनुक्रमणिका


उत्सव १
तुझ्या निळ्या आभाळाखालीं २
गीत ३
बाहेर ५
सुकतीच्या ओठांवर ७
स्टेशन ८
दूर १०
अर्धी रात्र १२
मुक्ति १३
पांखरूं १४
परीकथा १५
भेट १७
मिठी १९
कवडसे २०
चंद्र २१
वर्षा २२
रोजच जासी दूर २४
खुणा २५
प्रथमच माझे शब्द पाहिले २६
फुलें २७
संध्याकाळीं २८
तडा ३०
झुडूप ३१
जन्म ३२
कहाणी ३३
शाप ३९
गेलें आभाळ संपून ४०
एक चांदणी ४२
मिटुनि घेतलें ४३
खिडकीच्या गजांपाशीं ४४
नाहीं विसरतां येत ४६
माझें मन ४७
प्रश्न ४८
क्षणझडीची सुनी रात्र ४९
भ्रम ५०
सुजाण ५१
पावसाचीं पानें ५३
तोंवर उभा राहीन ५५
दान ५६
प्रार्थना ५७
घर ५८
एक अस्तित्व ५९
कळी दंव होण्याआधीं ६०
पक्षी ६२
रेती ६३
कैदी ६४
रंग ६५
तुझी खूण जपतांना ६६

पण सारें ६७
निष्पर्ण ६८
येईन एकदां पुन्हा ६९
एक क्षण ७२
झाडें ७३
केव्हां ७४
दुपार ७५
किती दिसांनीं ७६
कळी ७८
किती किती ग हुकल्या वेळा ७९
फूल ८०
एकटी ८१
सूर ८२
रात्र ८३
पुन्हा किती दिवसांनीं ८४
शुभ्र ८५
दिवा ८६
तोल ८७
निःशब्द ८८

**शुद्धिपत्र :**

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ५३ | १७ | स्पर्श भारल्या | स्पर्शभारल्या |
| ५६ | ७ | घेणार होतें | घेणार होतों |
| ६८ | १ | आठव तो | आठवतो |
| ७४ | ६ | तीळ | तळ |
| ८५ | १५ | डोळाच्या | डोळ्यांच्या |

तो पहिलावहिला
उत्सव डोळ्यांचा...

तीं अंधाराच्या गाभाऱ्यांतिल
चंद्रज्योतिचीं फुलें...
ती मऊ धिटाई...लाख पाकळ्यांची...
ती नव्यानव्यानें
माझीच मला पटलेली
पहिलीवहिली ओळख
आकाशच्याा मोरपिसाखालीं...

हलकेच पहाटे
पाण्यावर कुजबुजइवलीं...
टपटपलेलीं
प्राजक्ताचीं फुलें...
त्या पाण्याचा सुगंध नाजुक
सांठवलेली ज्यांतुन
ती अबोध शिरशिर...

तो पहिलावहिला
उत्सव डोळ्यांचा...

मुंबई
२६-२-५७

क्र. क्र. 92७88

# तुझ्या निळ्या आभाळाखालीं

तुझ्या निळ्या आभाळाखालीं
गवतावर अल्गद झुलणाऱ्या
परीकथांचें बाल्य हरपलें...
आणि झऱ्यांच्या डोळ्यांवरतीं
झुकलेल्या अवखळ फांद्यांचे
हंसतां हंसतां ओठ करपले...

तुझ्या निळ्या आभाळाखालीं
काळोखाची भिंत आंधळी
कोसळली नाजुक स्वप्नावर
तेव्हांपासुन
प्रकाश हलके चिवचिवणारी
एक चांदणी
अबोल झाली...

तुझ्या निळ्या आभाळाखालीं
हंसले डोळे लपवित आंसू
अन् मातीनें गिळुनि टाकिला
खोल हुंदका :
अशब्द त्या दुःखावर झुलला
रानफुलांचा गर्द कवडसा..

मुंबई
४-१-१९५७

## गीत

थकलेले पाय जरा
बुडवुन घे
गार निळया वर्तुळांत पाण्याच्या...
हळुच पंख
हातांच्या पंजांचे
झुकव जरा डोळयांवर
आणि पहा
चमचमत्या पाण्याशीं जुळलेलें
क्षितिजाचें यमक निळें...

आठवतें ?
जेव्हां बुजल्या होत्या
वाटा भंवतीं सगळ्या
सौख्याला चव नव्हती उरलेली
दुःखाची भोवळही बोथटली
त्या वेळीं
गार निळें वर्तुळ हें
झालें क्षण तुजसाठीं
यक्षजळांतिल होडी :
संथ उन्हाच्या पिवळ्या कांठानें
गाण्यांच्या बेटावर नेणारी...

थकलेले पाय जरा
बुडवुन घे

गार निळ्या वर्तुळांत पाण्याच्या
आणि पुढें
पायांच्या तारांवर छेडित जा
संथ उन्हाच्या पिवळ्या कांठानें
दिशामुक्त गीत तुझें
सृजनोत्सुक वास धुळीचा ज्याला...

मुंबई
१६-१-५७

# बाहेर

बाहेर
चांदण्याच्या बावऱ्या फांदीवर
धुक्याचे दोन पक्षी
जुळ्या कळ्यांसारखे
उमलले आहेत...

बाहेर
दूरच्या चांदणीच्या
बावलेल्या पापणीवरून
वाऱ्याचे दंवप्रसन्न ओठ
फिरत आहेत...

बाहेर
गुल्मोहरच्या झाडावरचे
पिंजरपक्षी
अर्धमिटल्या लाल चोंचींत
चांदण्याचे निळे-पांढुरके थेंब
धरून बसले आहेत...

बाहेर
विघळलेल्या सावल्यांचा
पांखरांच्या डोळ्यांसारखा
नितळ काळा प्रवाह
वाहतो आहे...

"आहे का?"
"...होय..."
"—मग जवळ ये...सगळें विसरून..."

मुंबई
२४-१-५७

# सुकतीच्या ओठांवर

सुकतीच्या ओठांवर
पक्ष्यांचा शुभ्र थवा
शब्दांविण झुरण्यापरि
खोल निळी गूढ हवा...

सुकतीच्या पापणिशीं
लाटांच्या आठवणी...
कळकांतुन सूर तसें
थरथरतें स्वप्न मनीं...

सुकतीच्या ओठांना
जाणवतो शुभ्रपणा...
थकलेल्या मातीवर
भरतीच्या गाढ खुणा...

सुकतीच्या ओठांवर
पक्ष्यांचा शुभ्र थवा
क्षण उडुनी...स्थिरत पुन्हां
अधिक गूढ करित हवा...

मुंबई
२५-१-५७

## स्टेशन

घुमणाऱ्या पारव्याच्या
कंठापरी
डेरे हिरव्या झाडांचे...
फूलपांखरी उन्हाच्या
तीव्र पिवळ्या ओठांनीं
निळें आकाश पितात
कळे डोंगरमाथ्यांचे...

...मुंबइला जाऊन पोचते
तुमची गाडी : माझी नाहीं...

खोल समोर दरीच्या
दाट हिरव्या नभांत
निळें पांखरू झऱ्याचें
उडे...तरल मजेंत...
टंच तांबड्या वाटेला
फुसलावूनिया वारा
नेतो झुडुपांच्या मार्गें...

...मुंबइला जाऊन पोचते
तुमची गाडी : माझी नाहीं...

दूर दूर वाहणाऱ्या
वीजतारांना फुटते

शुभ्र पक्ष्याची चांदणी...
ओल कांपरी झाडांची
घेते टिपूनिया पाणी...

माझें स्टेशन
निळेजांभळे पंख फुटुनिया
उडून जातें
झाडांवरुनी...पाण्यावरुनी
दरीपलिकडे...
मुंबइला जाऊन पोचते
तुमची गाडी : माझी नाहीं...

मुंबई
२८-१-५७

## दूर

दूर दूर
या गवताच्या
हिरव्या ओळीपुढें
तळ्याचा
निळा पूर्णविराम

दूर दूर
तिरप्या शेतांत
चौकोनी उन्हांत
गवत कापणारा
ओणवा ठिपका

दूर दूर
अकस्मात् उडून
ढग बनलेला
उनाड डोंगर

दूर दूर
धुक्याच्या समुद्रांत
तरंगत जाणारी
क्षितिजाची होडी

दूर दूर
माझ्यापासूनही मी
दूर...दूर...

मुंबई
२९-१-५७

# अर्धी रात्र

अर्धी रात्र
शब्दातीतच असण्याची
अर्धी रात्र
शब्दांना अडखळण्याची

अर्धी रात्र
सदाफुलीच्या
चांदणिवेड्या गाण्याची
अर्धी रात्र
डोळ्यांमधल्या
अबोल गहिऱ्या पाण्याची

अर्धी रात्र
उतट कुसुंबी मोहाची
अर्धी रात्र
काळोखाच्या डोहाची

अर्धी रात्र
कळूनही नच कळण्याची
अर्धी रात्र
मिटून डोळे जळण्याची

मुंबई
३०-१-५७

# मुक्ति

आकाश गोठलें तेव्हां
कड्यावरुन काळोखाच्या
मींच मला
विव्हळ
साद घातली होती

काजळडोहांतुन
एकलेपणाच्या
मीं मला शोधण्यासाठीं
खोल...खोल मिटल्या डोळ्यांची
बुडी घेतली होती

आणिक जेव्हां
मातीच्या नसांतल्या
प्रदीप्त हिरव्या रक्ताचीं
झालीं लाल फुलें
समोरच्या पांगाऱ्यावरतीं
तेव्हां
पागल होउन
मीं केला होता मुक्त घोष
मींच मला
कळल्याचा...आढळल्याचा

मुंबई
२७-२-'५७

## पांखरूं

झाड पेटलें फुलांनीं :
फुटे डहाळीला ऊन
झुलणाऱ्या गवतांत
आलें आकाश रुजून

दोन कवडसे झाले
पंख जादूच्या तळ्याचे :
वाटे उडेल हें पाणी
निळ्या अभ्रकी गळ्याचें

मुंबई
२७-२-५७

## परीकथा

हवेच्या नितळ पाण्यांत
संथ तरंगतात
झाडांच्या हिरव्या होड्या
लाल फुलांच्या शिडांच्या

पोपटी गवतानें
उतूं जाणारी माती
पापणीवरून फिरवते
हळुवार सावल्या
फुलांच्या देशांतून
झुलतझुलत आलेल्या

शुभ्र निळ्या झऱ्याच्या
उमद्या घोड्यावरून
झुळझुळत जाते
मावळत्या उन्हाची
सोनेरी परी

खडकाच्या वळणावर
घोडा थांबवून
वाऱ्याला सांगते :
"असाच चल
माझ्याबरोबर
शोधण्यासाठीं

अंधाराच्या जंगलांत
हरवलेली
काजव्याच्या खड्याची
जादूची आंगठी..."

मुंबई
१०-३-५७

# भेट

विस्फारलेल्या खिडक्यांचें
मंद गुलाबी घर...
लालधूसर पाऊलवाटेच्या
क्षितिजावर
उजेडणारा गुल्मोहर :
तिथली तहानेली प्रतीक्षा
आणि नंतरची तृप्त भेट...

मिठींत मिटलेल्या डोळ्यांतील
निगूढ रात्रींत
तूंच उगवलीस होऊन
शुभ्र चांदणी :
प्रकाशाशीं पहिलें नातें...

तूं तुझ्या श्वासांतून
गात होतीस
माझ्या मनांतली पहांट :
वाऱ्याची पहिली ओळख...

त्या वाऱ्याची...त्या चांदणीची
माझ्या मनांत झाली
एक गाण्याची कळी
पहिल्या भेटीच्या
रिमझिम् सीमेवर
फुलण्याची वाट पहाणारी...

मृत्यूनंतर काय होतें ?
कुठें जातात
सारे कल्लोळ...सारे अनुभव.. ?
काळोखाच्या पहाडापल्याड
काय आहे ?

माझ्यापाशीं
एकच उत्तर :
लालधूसर पाऊलवाटेच्या
क्षितिजावर
उजेडणारा गुल्मोहर...
पहिल्या भेटीच्या
रिम्झिम् सीमेवर
फुलण्याची वाट पहाणारी
गाण्याची कळी...

मुंबई
२९-३-५७

## मिठी

अशा उन्हाला
बांध नसावा...
उडण्यासाठीं
गवताचें आकाश असावें
तुडुंब हिरवें...

या बकुळीला
मखर नसावें...
फुलण्यासाठीं
पानांच्या पापण्यांत मिटल्या
शहारता एकांत असावा
अबोल बुजरा...

अशा तुला अन्
भान नसावें...
बुडण्यासाठीं
माझी गहिरी मिठी असावी
उत्कट दुखरी...

मुंबई
२७-४-५७

## कवडसे

काधिं काधिं येतो अंधाराला
नाजुक वास तुझ्या केसांचा
स्पर्श पापण्यांवरतीं झुलतो
धुक्यांत बुडलेल्या श्वासांचा

मिटलेल्या डोळयांतुन हलती
हे भासांचे असे कवडसे
अन् विस्कटल्या कळकांमधुनी
रात्रीचे गोठती उसासे

मुंबई
१३-५-५७

## चंद्र

दुःख कधींच संपलें
सुकलेल्या चांदण्याचें
क्लेश उरले नाहींत
निबर या पापण्यांचे

याच कोवळिकेसाठीं
केला होता खटाटोप :
पण चंद्र करपला
मोडे अर्ध्यावर झोप

हंसण्याच्या आड पण
कधीं तरी चंद्र रडे
कमावल्या गाण्यामागें
वारा कण्हत ओरडे

मुंबई
१५-५-५७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 92688

## वर्षा

मिटलेल्या खिडक्या
उघडल्यास तूं
कैफांतच...
बाहेरुन
आषाढांतिल धारांची
उन्मनस्क झड
मातीच्या गंधानें झिंगत येणारा
तृप्त गारवा...
असली हवा :
तुला नेहमीं हवीहवीशी असणारी
झाडांच्या झिपऱ्या उधळुन देणारी
वीजवाहत्या तारांची
विचित्रवीणा
झिणझिण झंकरणारी...
रक्तांतिल अनादि गाणें शिलगविणारी
असली हवा...

मऊ ओलसर गवताला
ठाउक आहे सारें :
ठाउक आहे तेव्हांचें पागलपण
रक्तांतिल लाख कळयांचें वादळ
चहुं बाजूंनीं घेरित भारित येणारी
काजळभोर ढगांची किमया
धडधडत्या हृदयाची भाषा :

"खूप...खूप
बुडण्याइतुकें तुला मला
आणखी...आणखी
जाणिव हरण्याइतुकें..."

तूं नव्हतिस
मी नव्हतों
होती केवळ
आषाढांतिल धारांची
उन्मनस्क झड
रक्तांतिल लाख कळयांचें वादळ
"बुडण्याइतुकें...खूप...खूप..."

मुंबई
१९५७

# रोजच जासी दूर

रोजच जासी दूर असा तूं
अबोल होतीं झाडें सारीं
परकीं बनती रानफुलें अन्
ताऱ्यांतिल थिजतात सतारी

रोजच जासी दूर असा तूं
कर माझे भरती सोन्यानें
मलाच कळतें : उरांतली पण
रडते मैना मुक्या मनानें

रोजच जासी दूर असा तूं
पिशाच्च बनते माझी वाचा
आणि दंवाचीं गाणीं माझीं
क्षणांत बनती कांचा त्यांच्या

मुंबई
१९५७

अनुक्रम .................... दि: ..............

## खुणा

डोळेभेटीची ओळख
चारचौघांत विसर
दाट पानांत लपव
भित्री श्रावणाची सर

फुलपंखी कुजबुज
ठेव ओठांत मिटून
वर निबर शब्दांची
रास ठेवावी रचून

पापण्यांची गूढ भाषा
अर्थ तुला मला ठावे
वाट चुकल्यावरच
पांखरांनीं गाणें गावें

पळसाच्या फुलांकडे
पहा हळूच चोरून
लपविल्या आशयाच्या
खुणा तिथेंच अजून

मुंबई
१९५७

## प्रथमच माझे शब्द पाहिले

चंद्र-उमलत्या सरल्या रात्री
थंड धुकें हें आलें
निळे कवडसे
शिडें मालवुन
डोळ्यांआड बुडाले

पंख तुटुनिया शीळ बावरी
ओठांवरतीं पडली
दुखावल्या चोंचींतिल गाणीं
अर्ध्यावरतीं अडलीं

किती वेळ हा उभा एकटा
अंधारांत इथें मी :
प्रथमच माझे
शब्द पाहिले
एकांतांत रिते मीं

मुंबई
१९५७

## फुलें

उशालगतचीं
तीं आजारी...फिकट फुलें
उघडया डोळयांचें
तें खिन्न मिटलेपण
त्या डोळयांतिल वाटेवर
मिणमिणत्या अंधारीं
तूं मला दिलेलें
कधिं न संपणारें
एकाकीपण

बाहेर देवळापाशीं
खिन्न दुमडल्या ओठांचें
तें ऊनहि सरतीचें
उशालगतच्या
आजारी...फिकट फुलांच्या रंगाचें...

मुंबई
१९५७

# संध्याकाळीं

संध्याकाळीं
वाट तुझ्यासारखीच होते :
दाट सावल्यांची
लांबसडक वेणी
तिरकस डौलानें
रुळवीत वक्षावर
आपल्या सामर्थ्याची
असूनही सावध जाणीव
धूसर तंद्रीचा घुंगट घेऊन जाणारी

संध्याकाळीं
झाडें तुझ्यासारखींच
लयधुंद, रूपमग्न होतात
ज्यांच्या रंध्रारंध्रांत
असतें थबकलेलें
एक नृत्य

संध्याकाळीं
आकाश
तुझ्यासारखेंच दूर असतें...दूर नसतें...
असतें सांगत कांहींतरी डोळ्यांनीं
जें कळतें...आणि कळतही नाहीं...
जें नेहमीं ठेवतें
निळ्या भटक्या तंद्रींत

ज्याला
एक अपार्थिव सुगंध असतो
तुझ्या सहवासासारखा

मुंबई
२७-१०-५७

# तडा

शब्दांतल्या काळोखांत
बन ताऱ्यांचें झुकलें
काजळाच्या कांठापाशीं
डोळे पाऊल चुकले

वेदनेच्या प्राजक्ताशीं
हळू मिटला प्रकाश :
थेंबांतून पावलाशीं
टपटपलें आकाश

त्याच क्षणीं शब्द झाले
अर्थांघरींच अबोल
रक्तांतल्या सावल्यांचा
डोह दुभंगला खोल

जून इमान किंचाळे
केस पिंजारून आंत
बन ताऱ्यांचें जळलें
खोल मिटल्या डोळयांत

दुभंगल्या शपथेचा
जरी सावरला घडा
तळहाताच्या रेषेंत
माझ्या, कोरलेला तडा

मुंबई
१३-७-५८

## झुडूप

काळोखाच्या उताराशीं
वाहणारा गूढ झरा
पान पडतां दचके
सशासारखा बुजरा

दाट भितऱ्या पानांची
गुंग ओलसर हवा
मधूनच तिढी फांदी
गुणगुणते काजवा

डबक्याच्या कपाळाशीं
थंड बेढब झुडूप
पडे बेडूक होऊन
डोळे मिटून गुडूप

मुंबई
१५-७-५८

जन्म

मीं न घेतलें, तरी मिळालें
कधींच मीं जें घेउं नये
तूंहि दिल्याविण दिलेंस सारें
कधी कुणीं जें देउं नये

पिचलेल्या जन्मांतुन रुजले
वीजभारले सूर नवे
ऐकण्यास जे व्यथेंत मिटले
लोचन राधेचेच हवे

श्याम घनांची उतट अनावर
कासाविस बरसात अशी
काळोखाच्या यमुनेकांठीं
धडधडणारी हवा पिशी

मलाच नकळत माझे डोळे
यमुनेंतुन वाहत जाती
अंधपणांतच चाचपतों मी
फुटल्या जन्माची माती

दान तुझें हें घेण्यासाठीं
फुटल्यावांचुन हात कुठें?
या भरलेल्या रित्या ओंजळिंत
हिरवा हिरवा जन्म फुटे

मुंबई
१८-७-५८

## कहाणी

एका परीची कहाणी
जिच्या डोळां आलें पाणी

परी कधीं रडत नसते
फुलत असते, हंसत असते
तिथें दुःख कुठून येणार ?
तिच्यासाठीं यक्ष गाणार
फुलांमधून दंव प्यावें
स्वप्नांतच गुंगत जावें
अंवतींभंवतीं झऱ्यांचीं गाणीं
ही तर होती पऱ्यांची राणी
दाह नाहीं...आग नाहीं
दुःखाची जाग नाहीं

एक दिवस काय झालें ?
नदीकांठीं कोण आलें ?
त्याच्या डोळ्यांत स्वप्न होतें
पाय धुळीनें भरले होते
तीच होती त्याची खूण
संपली नाहीं वाट अजून

परी तिथें कां आली ?
मागोमाग कां गेली ?
वाजलें नाहीं तिचें पाऊल ?
—सावलीसारखी तिची चाहूल

कां आली त्याच्यापाशीं?
पृथ्वीवरच्या माणसाशीं
परी कधीं बोलत नसते
मुलींदेखील हंसत नसते
ही कां हंसली?
ही कां बोलली?
पुन्हां पुन्हां तिनें जावें
डोळे भरून त्याला प्यावें
कधीं कधीं स्तब्ध राही
नुसती पाण्याकडे पाही
शब्द असून अबोल होते
सांगण्यासाठीं कांहींच नव्हतें
तरी सांगून संपत नव्हतें

माणूस म्हणे, "कशासाठीं
छळ माझा? सुखासाठीं?
ऐकलें आहे पऱ्या अशा
माणसांना करतात पिशा
मग खिदळत जातात उठून
माणूस बसतो मरणांत रुतून..."
यावर परी स्तब्ध राही
नुसती पाण्याकडे पाही

परी घरीं येत असे
कशांत तिचें लक्ष नसे
फुलांमधला रुसला गंध
झऱ्यांमधला अडला छंद
परीचा राणा जवळ आला
डोळ्यांवर फुंकर घालून म्हणाला :
" सांग सांग काय झालें ?
फूल अबोल कां बनलें ?
खिन्न कां माझ्या फुला ?
मागशील तें देतों तुला
चंद्रलोकांत तुला नेतों
चांदणीची होडी देतों..."
यावर परी स्तब्ध राही
नुसती पाण्याकडे पाही

एके दिवशीं नदीकांठीं
त्याचा हात घेऊन हातीं
तिनें सारें सांगितलें
मागूं नये तें मागितलें

प्राणांमधली जखम रोधून
तो म्हणाला तिला हंसून :
" आभाळाएवढें तुझें ऋण
फिटणार नाहीं जन्म उधळून

पण आतां परतून जा
सारें कांहीं विसरून जा
तुझें जग वेगळें आहे
माझें जग वेगळें आहे
माझ्या जगांत करपतात ओठ
तोंडांत काळोखाचा घोट
दगड होतात ताऱ्यांचे
श्वास कोंडतात वाऱ्यांचे
निजेवरती वीज पडते
फुलांची मान मोडते
पुन्हां कधीं येऊं नको
पुन्हां कधीं पाहूं नको..."

"कधींच का येऊं नको ?
कधींच का बोलूं नको ?"

"विसरून जाशील सारें कांहीं
तुझ्या जगांत शाप नाहीं
तुझें जग वेगळें आहे
माझें जग वेगळें आहे"

परततांना मागें वळून
परी म्हणाली जरा थांबून :

"कांहीं तरी देऊन जाईन
माझी आठवण ठेवून जाईन
देऊन जातें तुला गाणें
गेल्या जन्मींचें हें देणें
गाणें देतें ताऱ्यांचें
झऱ्यांचें, वाऱ्यांचें
न बावणाऱ्या फुलांचें
सावल्यांच्या झुल्यांचें
खोल खोल मनांत ठेवशील ?
तूं मला काय देशील ?"

प्राणांमधली जखम रोधून
तो म्हणाला तिला हंसून :
"माझ्यापाशीं आहे कांहीं
जें तुझ्या जगांत नाहीं..."

"मी तर आहें पऱ्यांची राणी
माझ्या जगांत सुखांच्या खाणी
जें माझ्या जगांत नाहीं
असें असेल कसें कांहीं ?"

"माझ्यापाशीं दुःख आहे
माझ्या डोळ्यांत अश्रू आहे
तोच तुला देऊन जाईन
माझी आठवण ठेवून जाईन

माझ्या अश्रूंत गाणें येईल
तुझ्या गाण्यांत अश्रू राहील..."
आणि परीनें वर पाहिलें
तिचे डोळे भरून आले
पुन्हां कांहीं बोलली नाहीं
मागें वळून पाहिलें नाहीं
स्वतःलाच विचारून पाही
तिला उत्तर मिळालें नाहीं

पऱ्यांनाही प्रश्न पडतात
ज्यांचीं उत्तरें मिळत नसतात

अशी ही परीची कहाणी
जिच्या डोळां आलें पाणी

मुंबई
१९-७-५८

## शाप

काळोखाची कडू कॉफी
वर वादळाची वाफ
घोट घोट घेतां घेतां
ओठांवर जळे शाप

शाप गोंदलेला भाळीं
ज्यांत पिकली वेदना
फळ तुटतांना फांदी
कळ पानांना सांगेना

कडू घोटांचा भोवरा
खोल बुडलेले पाय
ताल निरर्थ बोटांचा
जीवघेणा निरुपाय !

कांपणाऱ्या आशयानें
शब्द टाकिले खुडून
कडू काळोखांत गेलें
माझें आभाळ बुडून

आतां उरलेला फक्त
कडू घोट काळोखाचा
बावलेल्या ओठांपाशीं
थेंब अबोल रक्ताचा

मुंबई
२५-८-५८

## गेलें आभाळ संपून

किती देऊं किती घेऊं
गेलें आभाळ संपून
चंद्र ओंजळींत आला
डोळे हळूच मिटून

धुकें कातर बोटांचें
फिरे पापण्यांवरून
झुके काजव्यांची रात्र
ओथंबल्या केसांतून

श्वास तेव्हां शब्द होते
अर्थ मिटलेले डोळे
होय मातीचें आभाळ
रक्त जुईजुई झालें

वीजनग्न क्षणांत त्या
बुडे दिशांचेंही माप
सर्वस्वाची गाढ कळ
बुडे पुण्य...बुडे पाप

किती देऊं...किती घेऊं
गेलें आभाळ संपून
रात्र ओसरली तरी
चंद्र उरला अजून

मुंबई
१०-१०-५८

## एक चांदणी

एक चांदणी कोसळतांना
गीत म्हणाली
गीत म्हणाली आणिक नंतर
पत्थर झाली

सरळ भाबडी वाट अचानक
वनांत वळली
वनांत वळली अन् नंतर
डोहांतच बुडली

सर्वस्वाचें दान उधळण्या
कुणि तळमळली
तळमळली अन् मिटून डोळे
मनांत जळली

अजुन कधितरी पत्थरांतुनी
कण्हतें गाणें
डोहाकांठीं फिरे पांखरूं
केविलवाणें

मुंबई
१४-१०-५८

# मिटुनि घेतलें

मिटुनि घेतलें डोळ्यांत तुला
मुळिं न कुणाला कळलें कांहीं
रात्र जरी ओसरली तरिही
रात्र मुळीं ओसरली नाहीं

मिटुनि घेतलें ओठांत तुला
मुळीं न कळलें शब्दांनाही
जशी दंवांतुन रात्र मिटावी
कळूं नये पण रात्रीलाही

मिटुनि घेतलें रक्तांत तुला
मोरपिसें बोटांचीं झालीं
मिटल्या डोळ्यांनीं ओठांना
त्या रक्ताची शपथ घातली

मिटुनि घेतलें माझ्यांत तुला
सर्वस्वाचा जिथें पहारा
तुझ्यांत मी ओथंबुन बुडलों :
गाढ जळांतुन पहाटतारा…

मुंबई
२९-१०-५८

## खिडकीच्या गजांपाशीं

तूंच आपुल्या हातांनीं
झांकिलेस माझे डोळे
आणि तूंच म्हणालीस :
अशी आंधळी मी झाल्यें

(खिडकीच्या गजांपाशीं
उभें माझें अंधपण :
भर दुपारच्या कांठीं
रात्र डोळ्यांत मिटून)

माझ्या जागेपणीं मला
आला आंधळ्याचा डाव
डोळे मिटल्यावाचून
नाहीं सांपडत ठाव

(खिडकीच्या गजांपाशीं
सूरसूर वितळले
रात्रभोर जळांत त्या
डोळे हळूच बुडले)

खोल मेंदूत अंधुक
फुटे कलश लाटांचा
तिथें डोहापाशीं उभा
गुंता आंधळ्या वाटांचा

(खिडकीच्या गजांपाशीं
रात्र गुंतली बोटांत
ओथंबली पापण्यांशीं
गाढ दाटली ओठांत)

मुंबई
११-११-५८

# नाहीं विसरतां येत

नाहीं विसरतां येत
रक्त-उकळीची मिठी
पंख पंख झाली दिठी

नाहीं विसरतां येत
प्राणभरतीची हांक
भोवऱ्यांची आणभाक

नाहीं विसरतां येत
झेप आंधळ्या उडीची
घडी आभाळबुडीची

नाहीं विसरतां येत
नसांची ती वाताहात
उशीखालीं तुझा हात

नाहीं विसरतां येत
पाय ओढणारें पाप
मीच माझा होतों शाप

मुंबई
२७-११-५८

तिच्या डोळ्यांतलें ऊन
जेव्हां येतें सावकाश उतरून
दंवाचे ओलसर दिवे करीत
पानरेघा मंद सोन्यानें भरीत
तेव्हां असतें
शरदांतील सकाळ माझें मन

तिच्या डोळ्यांतला पक्षी
सकाळशुभ्र...आभाळलक्षी
जेव्हां जातो उंच उडून
कोवळें पाणी
सावलीनें डहुळून
तेव्हां त्याच्यासाठीं
ओथंबून झुकलेली फांदी असतें माझें मन

तिच्या डोळ्यांतली रात्र
जेव्हां बुडवते गात्र न् गात्र
समजूतदार हिरवे चुडे पानांचे
आवाजहि करीत नाहींत
काजवा हळुवार टपटपतो सावल्यांच्या राईंत
जेव्हां मिटल्या मिटल्याच डोळे जुळतात
कबुतरांच्या जोडीसारखे बिलगतात
तेव्हां सर्वस्वानें बहरलेली तीच असतें माझें मन

मुंबई
८-१२-५८

## प्रश्न

इच्छेनें केलें तें पाप तरी
स्वच्छ शुभ्र कांचेच्या पात्राला
एकही न अजुनि तडा...

कां न जुळे रात्रीशीं यमक तरी निद्रेचें?
हातांच्या तळव्यांवर थेंब कसे घामाचे ?
अन् माझें माझ्याशीं परकेंपण छळणारें कां असलें?

रात्रकिडे : तीक्ष्ण सुयांची किरकिर
या जुनाट ढलप्यांच्या काळोखा पोखरते...
फुटलेल्या शिल्पांचे अवशेषच हीं झाडें

कीं तें पापच नव्हतें?
गंधगहन इच्छेला
शापहि नव्हता मुळींच?
त्या होत्या चाकोऱ्या प्रतिध्वनींच्या केवळ
जाणिवेंत वण ज्यांचे?

या कभिन्न विस्तारीं एकटाच ठिपका मी...

प्रश्न नको...प्रश्न नको...प्रश्न नको
डोळ्यांच्या कांठाशीं थकलेलें जाग्रण हें
बोटांना गवतावर दंव लागे थंडगार...

मुंबई
९-१२-५८

## क्षणझडीची सुनी रात्र

क्षणझडीची सुनी रात्र...साऱ्या वाटा खिन्न अबोल
एकही दीप जागा नाहीं; अंधारणारी वेदना खोल
खचलेल्या मंदिराच्या चिऱ्यासारखी :
ज्यांत कधीं तरी पालवलेल्या भक्तीची उत्कट साक्ष
आज शब्दहीन आहेत वरचे तारे अनंत लक्ष...

उरांत धस्स व्हावें तशा कोसळणाऱ्या दूर लाटा
काळोखांत. देठांत दुखावलेला वारा. रुतून खोल कांटा
पायांत वळणावर थबकलेलें झाड...
काळोखांत काळोख बुडतो आहे
मिटलेल्या डोळ्यांत एक देऊळ ओलें आहे...

आज त्राण हवें आहे एकटक बघण्यासाठीं
डोकावून मला माझ्यांत वाहत्या काळोखाच्या कांठीं
विराट अलिप्त हातांतून गळणारे हे क्षण...
क्षणझडीची सुनी रात्र...साऱ्या वाटा खिन्न अबोल
अजून मिठी जागी आहे : डोहासारखी अपार खोल...

मुंबई
२५-१-५९

## भ्रम

उडूं लागली खिडकी
सुटे बिजागरांतून...
जुन्या चिंचोक्यांचे झाले
कोनाड्यांत ओले क्षण...

ताक चाळतांना बघे
आजी चपापून वर :
आजोबांचा जुना कोट
हलूं लागे खुंटीवर...

जुनें लोड खाकरून
म्हणे, "आण थोडें ताक..."
घेई झांकुनिया डोळे
माजघरांत काळोख...

चुलींतून धुराचा ये
केस पिकलेला लोट...
एक कवडसा ठेवी
घट्ट ओठांवर बोट...

मुंबई
३०-१-५९

# सुजाण

अनुक्रम 47844 वि: काव्य
2029 नोंद दि.

पावसाळ्यांतल्या असावध रात्रीं
कुणीच आलें नाहीं;
पुढल्या जन्माचा हवाला देत
रडणाऱ्या काळोखाकडे
कुणींच जीव गहाण टाकला नाहीं;
कासावीस डोळ्यांनीं
प्राणांना मिठी घालीत
"नको जाऊंस...नको जाऊंस"
कुणीच म्हणालें नाहीं
अश्रूंवांचुन निःशब्द रडत...

आयुष्यभर स्वीकारलेलें
कुणींच नाकारलें नाहीं
एका जीवघेण्या क्षणासाठीं...
घडी विस्कटली नाहीं
शब्द चुरले नाहींत
तुटलेलीं पानें
रात्रीच्या केसांत अडकून
रडलीं नाहींत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 92688

कांहींच झालें नाहीं...
मात्र झालीं आहेत
डोळ्यांखालचीं काळीं वर्तुळें
समजूतदार :

पाऊस कोसळून थांबल्यानंतरच्या
काळोखासारखीं
खोल...सुजाण...

मुंबई
७-३-५९

## पावसाचीं पानें

पावसाचीं पानें
दाटलेलीं काळोखानें
थेंबथेंब उलटतां
ओल्याचिंब खुणा...खुणा :

सावल्यांनीं झांकलेला
अंध डोह...
रक्ताहून खोल अर्थ सांगणारा
आदिअंतहीन मोह...
पुन्हां पुन्हां...आणि पुन्हां
वीजजांभळ्या धारेचा
लख्ख कोसळता गुन्हा

झाडाझाडांतून भरे काळी भूल
झांकलेल्या पलीकडे
झपाटल्या प्रवाहाची
पिळवटली चाहूल

वीजवेडे थेंब...थेंब
स्पर्श भारल्या केसांत
पाण्यानेंही पेटे वारा
डोळे मिटलेल्या धारा
भिजलेल्या सर्वस्वाला
खोल खोल फुटे तारा

पावसाचीं पानें
दाटलेलीं काळोखानें...

हिंगणें
१५-५-५९

## तोंवर उभा राहीन

आभाळ पिकून वाकलेलें, पण एकही थेंब नाहीं ;
नाहीं वाऱ्याचें पान इवलेंही गतीला. फांदीला सूर नाहीं :
पक्षीच तर गोठलेला. निर्वात स्पंदन खोल अंतरांत...
ओंजळींत काळोखाच्या दिव्याची लुकलुक एकुलती एक दूरांत...

जवळ-दूर सांधणारा एकच दीप : पैलथडीची हांक जशी
तरंगत येणारी तटावरून काळोखाच्या. चहूं दिशीं
स्तब्धता भोवऱ्यासारखी गतिमान अचल.
काळोखविलक्षण आकाश.
कोसळत नाहीं वेदनेला थेंब फुटून घनदाट अवकाश...

उभा राहीन स्तब्ध असा डोळे भिजवून
काळोखाच्या ओंजळींतल्या दिव्यांत : पुरे तेवढी खूण :
तेंच आश्वासन उगवत्या फुलांचें सकाळमोकळ्या
भिजतील गाण्यांचे निळे निळे पंख कोवळ्या
मऊ पाण्यांत : तोंवर उभा राहीन डोळे भिजवीत
फांदीची तहान सुरासाठीं जपून धरीत...

हिंगणें
१९-५-५९

## दान

त्याचें त्याला देऊन टाक
बाकी ठेवूं नको कांहीं :
मला देणार होतीस जें
त्याचा हिशोब होणार नाहीं

देणार होतीस असें कांहीं
आभाळ देखील लाजावें
घेणार होतें असें कांहीं
पृथ्वीनेंही बघत राहावें...

सारें आभाळ सांगण्यासाठीं
पाण्यापाशीं शब्द कुठें ?
शब्द आणि अर्थ यांत
घुमी रात्र उभी इथें

गाण्यांमधून वहात राहील
आभाळवेडी तुझी खूण
वृत्ती वृत्ती जपत राहील
तुझ्या डोळ्यांमधलें ऊन

त्याचें त्याला देऊन टाक
बाकी ठेवूं नको कांहीं :
माझ्यासाठीं स्वच्छ ऊन
स्वच्छ स्वच्छ दिशा दाही

हिंगणें
२३-५-५९

## प्रार्थना

कुणाकुणासाठीं इथें
खांदां वहायचा क्रूस ?
स्वतःच्याच बगंडींत
विझे दिवा : रिती कूस

थेंब खारट पाण्याचा :
अर्थ अश्रूंना एवढा
विझलेल्या गालांवर
फक्त ताजा ओरखडा

तरी संवयीनें लागे
घालावीच घट्ट मिठी
कशासाठीं एकांतांत
मग ओलावते दिठी ?

पेंगतांना कुंद वारे
तेवढीच उरे ओल
झाड प्रार्थनेसारखें
स्फुरे काळोखांत खोल

मुंबई
८-६-५९

## घर

होतो शाप या घराचा
विष फुटतें वाऱ्याला
येते भिजलेली कींव
जेव्हां दारीं आसऱ्याला

दोन पाय...दोन डोळे
लोंबणारे दोन हात
ओशाळल्या ओठांवर
टेकलेले ढिले दांत

कुडकुडे रात्र काळी
हींव विखाळें भरून
विझलेलीं चार झाडें
उभीं सांगाडे जपून

स्पंदणारा एक आत्मा
उभा खोल डोळयांमागें
याच्यासाठीं झाली होती
त्याला खिळेठोक मागें

बंद...सारीं बंद दारें
कुडकुडे रात्र काळी
लूत लागलेलीं सुखें
घर आंतून सांभाळी

मुंबई
२५-६-५९

## एक अस्तित्व

आत्मा नसलेलें एक झाड विचित्र उभें पायवाट अडवून
विझलेल्या वांझ फांद्या स्वतांत खुपसून घेऊन
उभें असण्याची कळ त्याच्या साऱ्या आसमंतांत
तिढीवेडी गांठाळ सावली गवताच्या हिरव्या नसांत...

शेवाळलेली गर्दी झोपड्यांची जवळच धरून आधार
गंजलेल्या पत्र्यांच्या बगंडयांत क्षयाच्या खोकल्यासारखा अंधार
असहाय्य दाटीनें गुरफटतात वेडसर हातवाऱ्यांच्या धुरांत
खोल खोल अदृश्य मुळें ज्यांचीं गुंतलेलीं झाडाच्या मुळांत...

काळोख ओरबाडीत कोसळतात बेसूर पावसाच्या धारा :
दांतखिळीसारखे वाजतात पत्रे ; अवजड पसारा
झाडाचा मधेंच हंसतो खदखदा अस्तित्व विचकून
क्षणभरच...पुन्हां थंड थंड फांद्या मिटून...

विझल्या खालींवरून कोसळत रहातात बेसूर धारा
रस्त्यावर पडलेल्या एकट्या...केविलवाण्या...जुनाट बुटासारखा
भिजत पडतो काळोखांत झाडाचा थंड अवजड पसारा...

मुंबई
३०-७-५९

# कळी दंव होण्याआधीं

कळी दंव होण्याआधीं
लांबव ही रात्र थोडी
फूल-ओल्या निःश्वासांची
थांबव ही वेडी घडी

असेलही रात्र खोटी
चंद्र असेल कांचेचा
खेळ असेल रंगीत
पाठ केलेल्या वाचेचा

दूर हाडकुळीं झाडें
मुकें मुकें झुंकतात
वेढणाऱ्या अंधारांत
काजव्यांनीं खंगतात

इथें येतांना वाटेंत
झाड झाड शोषिलें मीं
तम टोंचून नसांत
शाप माझे भोगिले मीं

उंबरठा खोलीचा या
झाला चोरट्या दिसांचा
झुले काळोख डोळ्यांत
थेंबथावऱ्या पिसांचा

जन्मे तोतऱ्या क्षणांत
शब्द हिरव्या पंखांचा
गर्भापरी सोशिला मीं
स्पर्श तांबड्या डंखाचा

कळी दंव होण्याआधीं
करूं नको मिठी सैल
गुंजलेले चार डोळे
उभे क्षणाच्या या पैल

मुंबई
२-८-५९

पक्षी

ओल्याशार स्वच्छ धुतल्या रस्त्यांवर कालेंभोर डोळेपण
चकित थबकलेलें. मेघझुकलीं झाडें. सांचलेल्या पाण्यांतून
नादी पावलांचीं उनाड पोरें उडवीत उडवीत जातात
डबकूडुबक् आवाजाचीं स्वप्नाळू बदकें सोनिया उन्हांत

किती दिवसांनीं ही ऊनमोकळी हवा अशी
इतकें खरें ऊन : ओठांना झाडांच्या चव लागावी जशी.
खिडक्यांच्या कांचांवर थेंब थेंब उंचावून पावलें बघणारे
त्यांनाहि असेल का मन कालेंभोर डोळेपण टिपणारें...जपणारें?

फांदीच्या टोकावर थेंबासारखी थरथर हळुवार
नुकल्याच पंख लगटून गेल्या पक्ष्याच्या स्पर्शाची. सारे आकार
कसे अनिवार उतट—संथ तरी! पापण्यांनीं हलके वल्हवीत जातात
डोळे तरंगत तरंगत उन्हावरून गवताच्या मऊ पोपटी मनांत

शिळंधार पावसानें एक पक्षी खोल खोल पुरलेला मनांत
जिवंत शीळ घालीत किती दिवसांनीं उंच उडाला हळव्या आभाळांत...

मुंबई
१६-८-५९

## रेती

जखम संपते तिथें सुरू होतें क्षितिज : लखलखता धाक
पण इथें नियमांच्या पात्यांचा. गळ्यांतली हांक
अदृश्य शेवाळावर शुभ्र भिंतींवरच्या घसरते;
आभाळ पिऊन कोसळणारी लाट रेती चघळीतच पसरते...

नसता झाला नाहीं तर तसा शरमिंदा अंधार
त्या रहस्यानें. नखांच्या कळ्या कळ्या करणारा अनिवार
आवेग नसता नासवला खोट्या मुखवट्यांनीं वांकून;
नसते थुंकले डोळे मनांत, कडू पापण्या झाकून.

ऊन ऊन उमललेल्या नग्नतेचें तुझ्या वाटलें पाप जेव्हां
प्रसवली इच्छा रक्तहीन अंधपणा. क्षितिज पुसलें तेव्हां
भीतीनें जखमेच्या. विझल्या रक्तांतल्या चंद्रांच्या वाटा.
उरली पायाशीं वांझ रेती...सुरकुतलेल्या लुळ्या लाटा.

मुंबई
१६-८-५९

# कैदी

गुळगुळीत सलामांचा कैदी मी पिवळ्या कागदांच्या गर्दींत :
परीटघडीच्या गळेबंद आज्ञा...पोटदुखीचे पिळवटले होकार...
कोत्या अक्षरांचे गिचमिड युक्तिवाद...तेलकट कुजबुज...
मिंध्या आकांक्षा...धूर्त ओठांच्या लटपटी लाचार...

केवढें भाग्य! खोलीला खिडकी असते : ज्यांतून
अस्सल लागलेल्या पंचमासारखें उंच हिरवें झाड दिसतें
पूर्वजन्मींची ओळख काढीत लालसर लाडिक पावलांचें
एक गुब्रें कबूतर हलकेंच खिडकीशीं येऊन बसतें

कंटाळून फिरणाऱ्या पंख्याखालचा कर्कश टेलिफोन
दूर पळालें तरी खणखणत रहातो येऊन स्वप्नांत
काळ्याभोर चोचींचे गाणारे शब्द शोधणारीं बोटें
पिळवटून ओढलीं जातात अडकून पोलादी ताणांत

देठ नसलेले पिवळे कागद धरतात झाडाभोंवतीं सुतकी फेर
आणि हवेला येतें अकाल प्रौढपण. अकस्मात् हरवून
कसा फिरतों पण दोन ओळींच्या फूलपांखरामागें
चुकवीत पिवळा पहारा :
उन्हाच्या सोनवळणावरून...आभाळलेल्या जळावरून

मुंबई
२२-९-५९

## रंग

ओठ रंगवण्याइतके सोपे
नसतात मनाचे रंग :
लाटांच्या चपळ चतुरावरचें
उन्हाचें हळवें अंग—

पारस्पर्शक. थुलथुलीत शब्दांत
नाहीं मिळत पावसाच्या अस्ताईंतलें
काजव्यांचें ओलेंपण...आरोहअवरोह
चंद्रभिनल्या रक्तांतले...

कांटेरी काळोख एकटेपणाचा :
कसें शिंपडशील त्यावर
फिरवण्यासाठीं, मिरवण्यासाठीं
मंद गंधाचें उंची अत्तर?

ओठ रंगवण्याइतके सोपे
नसतात मनाचे रंग :
ओलेता काजवा...भेगा तळपायाच्या...
चांदण्याची शीळ...कणा दुभंग...

उन्हाचें हळवें अंग
पारस्पर्शक...

मुंबई
७-१०-५९

## तुझी खूण जपतांना

कांहीं बोललों बावरें : हुंकारांच्या रात्रीपाशीं...मौनखोल
मध्यरात्रीं : निजेच्याही पलीकडे गूढ वाजावा पाऊस
तसें. एकदांच...तिच्या ओठांवर गोंदतांना
तीव्र मरण ओठांनीं..."नको उठून जाऊंस..."

सारें कांहीं आभाळाचें ! कशासाठीं मागतात
मग विझतांना ओठ असें ओठांपाशीं देणें ?
रक्त रक्त जागतात आणि कशासाठीं डोळे
सोसतांना बोलतात मुकेपणीं जीवघेणें ?

एक कोरडी डहाळी...आणि आंधळेंच धुकें...
एक तरी राहूं दे ना पान वेड्या मातीपाशीं :
फाटलेलें असेना का !...शिडें मिटून अबोल
काळोखांत वाहणार डोळे नंतर उपाशी

किती अक्षरांच्या मुंग्या जमतील...धावतील
तुझ्या वेड्या अर्थांपाठीं ? राठ पाय काळोखाचा
त्यांच्यावर अखेर ना ? कसें जपूं जाणलेलें
असें पाऱ्याच्या चोंचींनीं...गर्भमग्न जरी वाचा !

अशी इच्छा सोसतांना होतें मनच पांगळें
आणि गोठतात डोळे तुला पितां-पाहतांना...
देठ देठ जागा होता तरी वठतच गेला
उभा जन्म सावकाश...तुझी खूण जपतांना...

मुंबई
१४-१०-५९

# पण सारें

नाकार हवी तर ती इच्छा
ओठांना ठाउक पण सारें :
कां झिणझिणला काळोख तसा
कां डुचमळले हळवे वारे

नाकार हवी तर ती इच्छा
ठाऊक स्तनांना पण सारें
वेडेंपण उधळया बोटांचें
ते घुसमटलेले सुस्कारे

मुंबई
८-१२-५९

# निष्पर्ण

आठव तो चिमण्यांचा
चिवचिवत्रुरा थवा
बावलेल्या दुपारची
डोळेगढूळली हवा

मळलेल्या भिंती...आणि
अविकल्या इच्छा साऱ्या
अधिकच गढूळली
हवा खोलींत अंधाऱ्या

आठवतें घेतलेलें
कांहींच न देतां तुला
तुरा कोमट उन्हाचा
खिडकीशीं रेंगाळला

आठवतो थेंबाविण
घुमा दाटला आषाढ :
जसें काळोखांत उभें
पान नसलेलें झाड

मुंबई
२०-१२-५९

## येईन एकदां पुन्हां

पल्याड काळोखाच्या
जाण्याआधीं
घेऊन अंगभर ओळख :
सगळ्या फुळत्या खुणा
येईन एकदां पुन्हां
घुंगुरवाळ्या पाण्यापाशीं.

निःशब्द भरारीपरि पक्ष्यांच्या
असतिल डोळे
पंखोत्सुक असतिल झाडें सारीं

असेल तेव्हां पहांटही
पिसाहूनही हलका वारा
पाण्यावरतीं
तशि तंद्री आभाळाची.
आणिक तुझ्या
डोळ्यांच्या कांठाशीं
वाजेल न वाजेल असें
पाउल माझ्या श्वासांचें
सांगण्याहि आधीं
अबोल होतिल शब्द
कळ्यांस तेव्हां
असेल घाई फुलण्याची
अर्ध्या उघड्या डोळ्यांचा

बावरा सुगंधहि
असेल थबकुन
घुटमळतांना श्वास तुझे
ओठांवर...गालांवर...

होता पक्षी
निळ्याभोर पंखांचा
लुकलुक खळखळ डोळे
ओठांवर शीळ चांदणीइवली
पर्युत्सुक पिसें...

आणि एकदां
काळोखाच्या वेळीं
निळ्याभोर पंखांचा पक्षी
खिळवुन बसला डोळे
दृष्टीच्याही पल्याड अगदीं...
पंखहि हलवीना
शीळहि फुलवीना
फांदीच्याही डोळां आलें
दाटुनियां दंव
कां अवचित झाले डोळे
तीनसांजच्या पाण्यापरि ते
भयस्तब्ध अन् खोल ?
कां शीळहि भिरभिर
झाली प्रौढ अबोल ?

कां मिटुनी पानें फांदीनें
हळुच लपविले अश्रू ?

येईन एकदां पुन्हां
घेऊन अंगभर ओळख
सगळ्या फुलत्या खुणा...
मनभर सगळीं फुलें
त्यांच्याहि पाकळया कोमेजति का
लागुनि धग ओंजळिची ?
विसरतील का हे डोळे तेव्हां अश्रू ?
क्षणभर तरि त्या वेळीं
ती शीळ चांदणीइवली
लुकलुकेल ना ओठीं ?...

दिशा स्तब्ध
पान पान स्तब्ध
फक्त अंगभर माझ्या
रिमझिम ओळख

मुंबई
३१-१-६०

## एक क्षण

एक क्षण असतो बहरण्याचा आणि एक तुटून जाण्याचा
लवलवत्या हिरव्या लयीचा...एक कर्कश विलयाचा
फाटल्या ओठांची भिंत एक...बाजूला निळ्या डोळ्यांचें तळें
एक क्षण असतो इथून पाऊल जपून जाण्याचा...

"...शोषून घे...सारें तुझेंच...तुझ्यासाठीं...कड्यावरून
एकांताच्या लोटून दे कण नू कण शिलगावून...
ओली रेती भुसभुशीत...मऊ लाटा...उभार चंद्र...
इथें...तिथें...रंध्रारंध्रांत पेटत पेटवीत जा जळून..."

ऊन ऊन एक क्षण जगण्याचा...खूप खूप जगवण्याचा
पागल होण्याचा...उधळून उधळून सर्वस्व हरण्याचा
एका क्षणीं रिकामे होतात अचानक हात...
एक क्षण असतो आभाळासारखें भरून येण्याचा

एक क्षण असतो बहरण्याचा आणि एक तुटून जाण्याचा
एक क्षण असण्याचा...आणि एक असून नसण्याचा...

मुंबई
२-२-६०

## झाडें

कुठून येते इतकी समजूत या झाडांना !
गळतांनाही सगळीं पानें आंसूं नाहीं ...
कीं नसतें मनच यांना ? कसें म्हणूं ?
ळळा यांचा उनाडपंख पांखरांनाही

अंग अंग फूल फूल होतें तेव्हां
मन यांचें कुठें तरी एकटेंच फिरतें...
हिरवा उत्सव मिटून जातो तेव्हांदेखील
दर्दभोगल्या डोळयांची शान असते...

उन्हें जेव्हां परतून जातात बागेमधून
देवामधलीं निरांजनें हरवून जातात...
तेव्हां वाटतें कळेल यांचें मन मला :
कुठें हीं काळोखांत बघत असतात

मुंबई
२२-२-६०

## केंव्हां

जुनें देणें देण्यासाठीं किती जुळवूं पुन्हां पुन्हां
अशीं यमकें लक्तरांचीं...ठिगळांचे हे अनुप्रास
संभवाच्या क्षणीं उरतो थकलेला एक हुंदका
आशयाच्या गळ्याभोवतीं या शब्दांचा जून फांस...

कडे जिथें एकाकी श्वास श्वास रोधून असतात
आणि पाणी तीळ शोधीत डोळे मिटून स्तब्ध असतें
जेव्हां झाडें सळसळण्याचें विसरून जातात
मौनस्थ दिशांनाही उजाडण्याची घाई नसते...

शिल्पस्तब्ध अशा रात्रीं थरथरणाऱ्या बोटांना
केंव्हां होईल ओला स्पर्श ताऱ्यांच्या उमटण्याचा ?
देठांच्या खुणांपोटीं गंधतीव्र कळ एक :
भास साऱ्या झाडांतून एकाग्र उमलण्याचा...

मुंबई
११-४-६०

# दुपार

शरमेची ती दुपार
हपापल्या पात्याची
अन् डोळे गेलेल्या
घुसमटल्या नात्याची

सर्व पिसें झडलेलें
होतें नभ माथ्यावर
लवलवती जीभ लाल
भीतीच्या ओठांवर

आक्रसल्या मिनिटांची
घामानें भिजलेली
फिकट पांढरी घाई
घट्ट मिठी शिजलेली

शरमेची ती दुपार
वाळूचा डोह पुढें
कळिकेचें शुभ्र जिणें
मुरगळुनी ज्यांत पडे !

मुंबई
१३-५-६०

## किती दिसांनीं

जांभूळपिक्या
आल्या ग रात्री
स्वप्नांना जुईची जाग
डोळ्यांच्या कडे
बांधून झुला
झुलते कुसुंबी आग

डोळ्यांत सुर्मा
घालून झाडें
घेतात जळाचा थांग
सुरांसारखी
उमटे दूर
दिव्यांची हळवी रांग

झरा डोळेभोर
सावल्यांचा हा
पानांनीं झांकतो सूर
नाहीं ग नाहीं
सोसवत हा
काजवा जवळ...दूर

जांभूळपिक्या
आल्या ग रात्री
थरारे कोवळें गीत

किती दिसांनीं
पुन्हां ये भरा
बावऱ्या डोळ्यांची प्रीत

मुंबई
१५-५-६०

# कळी

कोण घेणारा इथें ?
ही कळी वेडी कशी ?
डोहवेडी ओढ ही
पावलांना कां अशी ?

प्रश्न सारे कांपले...
खोल एक दरी दिसे
टाक ना विझवून हे
गाढ ओठांचे ठसे

भोगिल्या शिशिरामुळें
श्वास श्वास असा गळे
कांपऱ्या थेंबापरी
चंद्र हा वर सांकळे

फूल होण्याआधिं हा
कोण मागतसे कळी ?
कांपती झाडें उरीं
रात्र कालवते जळीं

मुंबई
८-६-६०

# किती किती ग हुकल्या वेळा

किती किती ग हुकल्या वेळा...वाटच चुकल्या रात्री
किती फुलांचे महिने गेले कोमेजुन अन् गात्रीं
पानांआडुन सूरपंचमी कोकिळ उधळुन गेले
किती काजव्यांचे हिंदोळे झुरून अन् मालवले

कुणिं डोळयांचा दिवा लाविला मोहाच्या कांठाशीं ?
कुणीं फुलांची शपथ घातली बुडत्या उंबरठ्याशीं ?
कुणीं फुलविल्या हळू चांदण्या करांत ओलवलेल्या ?
कुणिं श्वासांनीं कळा भोगिल्या ओठांतुन मिटलेल्या ?

किती किती मीं हाक दिली ग तुजला पाउसकाळीं
किती भरंवसा धरिला जेव्हां डोह घुमे आभाळीं
किती भटकलों वाऱ्यासंगें घेउन भिजलीं गाणीं
शहारलों अन् पानोपानीं मिटलेल्या डोळ्यांनीं

जळांत हळव्या उन्हें सांडतां मंद सोनचांफ्याचीं
कुणीं घेतली भरून ओंजळ अपुल्या सर्वस्वाची ?
जन्मांची वेदना घेउनी कोण अचानक दारीं ?
कोण परतलें दिवा अनामिक लावुनिया माघारीं ?

किती किती ग हुकल्या वेळा...कितीक हुकलीं गाणीं...
किती आठवूं...कधिंच परतलें ऊनहि जड पायांनीं

मुंबई
१०-६-६०

## फूल

कशी कळी आली तेव्हां
गाल फुगवून
पुन्हां पुन्हां हवें होतें
तेंच नाकारून

कशी कळी थरथर
पावसांत न्हाली ?
नव्हताच मुळीं जेव्हां
पाऊस आभाळीं

कशी कळी भेटीसाठीं
सैरभैर झाली ?
अचानक धीट होतां
फुलूनच आली

मुंबई
११-६-६०

# एकटी

कशा इच्छा साऱ्या झाल्या
काजळाचे डोळे ?
रक्तांतून आभाळांत
नेणारे झोपाळे

मिटलेल्या अंधारांत
काजव्याची कळ...
अचानक परकी तूं
कुठलें हें बळ ?

दोघांच्याही पैल डोळे
शोधतात कांहीं :
जिथें फक्त एकटी तूं
असून मी नाहीं

मुंबई
१२-६-६०

## सूर

दोघांच्याही नकळत
रक्त शोधीतच होतें
एकमेकां
आणभाका
डोळे घालीतच होते

अज्ञाताच्या पैल दूर
होती जन्मांची ओळख :
पावसांत
न्हात न्हात
होता घुमत काळोख

नाच नाच माझ्या मोरा
इथें इथें तूं डोळ्यांत
पाण्याकाठीं
ओल्या रातीं
सूर दाटले गळ्यांत

मुंबई
१३-६-६०

# रात्र

रात्र :
तीव्र जळण्याची
रात्र :
तृप्त विझण्याची

हळवी
आभाळाची
आर्जवि
भुइकमळाची

आणि मुक्या कळशींतुन
खळखळ जळ भरण्याची

रात्र :
सर्व घेणारी
रात्र :
सर्व देणारी

मुंबई
१४-६-६०

## पुन्हां किती दिवसांनीं

आवाजच न लागलेल्या गाण्यासारखे
किती दिवस गेले असे आणि जड राती
नसांमधून सूर मुळींच वाहत नव्हते
केवळ कालच्या संवयीनें आज हात हातीं

डोळ्यांत डोळे मिसळूनही नजर दूर
पाण्याकांठीं उदास उदास एकटा धूर
नसलेलीं पानें जपत झाड उभें
घायल माती...कधींच ओसरलेला पूर

अचानक एक दिवस पाऊस आला
सतारीच्या तारांसारख्या सगळ्या वाटा थरारल्या
पावलांनीं गिरक्या घेतल्या हिरव्या गार
थेंब झेलीत पांखरासारख्या वृत्ती वृत्ती शहारल्या

पुन्हां किती दिवसांनीं आकाश अगदीं जवळ आलें
पुन्हां किती दिवसांनीं खिडकीपाशीं चंद्र झुकला

मुंबई
१५-६-६०

# शुभ्र

शुभ्र शुभ्र आरशांच्या
नितळ सकाळीं
शुभ्र शुभ्र पक्षी उंच
उडाले आभाळीं

मला जाग आली तेव्हा
मन दंव होतें
ओलीं झाडें...निळें तळें
शुभ्र कळ्या होतें

मन होतें मिटलेल्या
तुझ्या डोळ्यांपाशीं
इथें तिथें दहा दिशीं
तरी तुझ्यापाशीं

शुभ्र पक्ष्यांचीच झाली
क्षणांत सकाळ
तुझ्या डोळांच्या भोवतीं
फुलतां आभाळ

मुंबई
१६-६-६०

## दिवा

ओल्या गवताचा वास येतांना
अनोळखी पक्षी गीत गातांना
हळव्या निजेंत बुडतांना गांव
माझ्यासाठीं तूं दिवा एक लाव

थेंबथांबल्या झाडाच्या खालीं
जेव्हां होती माती गुपचुप ओली
डोळयांत डोळे होते मिटले
अकारण दूर तारे तुटले

गवती फुलांत चुकली वाट
कळण्याआधींच झाली पहाट
दंवाहून जग हळुवार झालें
अबोल तृप्तींत मिटले तारे

आठवणींचा त्या वास येतांना
अनोळखी पक्षी गीत गातांना
हळव्या निजेंत बुडतांना गांव
माझ्यासाठीं तूं दिवा एक लाव.

मुंबई
१९६०

# तोल

पान जरा हललें
काजवाहि बुजला
दूर दिवा हलके
नकळतांच विझला

गुणगुणले कांहीं
मंद मंद तारे
स्तब्धतेंत जेव्हां
हरवले किनारे

कोसळली नव्हती
अंधुकशी सरही
कां भिजलीं झाडें ?
माझें अंतरही...

उतरण तिमिराची
गूढ ही अवेळ
फिकट सावरीची
कोरही बुडेल

तोल अशा वेळीं
सावरूं नको रे
जन्म जन्म बुडतां
आवरूं नको रे

मुंबई
१९६०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

## निःशब्द

पाउसओले चिकचिक रस्ते घुंगटभिजली खाडी
नागमोडिच्या वळणावरतीं बावरलेली झाडी
मोरफुलोरा दाट फुलवुनी उत्तेजित अंधार
आळसलेल्या धुंद धुराचा दूर गडद गंधार

आतुर उत्सुक थरथरणाऱ्या अशा दिव्यांच्या वेळीं
दूर उमटल्या हलके हलके लुकलुक केशर-ओळी
मधेंच फिरवित मोरकुंचले सर एकादी यावी
मिठी मातिच्या गंधाची अन् श्वासांनीं भोगावी

सुगंध-ओला प्रहर असा हा घेउन आलिस जेव्हां
रक्तांतिल पुण्याई माझ्या फितूर झाली तेव्हां
मंतरलेलें काजळ डोळां...फुसलावणिचे ओठ
सज्ज धनुष्यापरी वळेसर बकुळीचा केसांत

किणकिणलीं कांकणें करांतिल चिथावणीची भाषा
थरथरली उजळली हवेवर कापुरगोरी रेषा
बनांत गंधित इच्छेच्या अन् मंथर चरणीं आली
एक मधाची लाडिकशी सर आणि डंखुनी गेली

कधीं थांबली बाहेरिल सर मुळींच कळलें नाहीं
उत्तररात्रींच्या अंधारीं चिंब दिशा या दाही
पाउसओले चिकचिक रस्ते : पाउसओले शब्द
ज्यांत दाटलें तेव्हांचें तें विश्व तृप्त निःशब्द

मुंबई
१९६०

ग्रंथ संग्रहालय ठाणे

REFBK-0012744
REFBK-0012744